सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग खुद्दच्या आस्थापनेवरील २४ अस्थायी पदांना <u>मुदतवाढ देणेबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक :- आस्थाप्र-२०१५/प्र.क्र.२७/आस्था-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २४ ऑक्टोबर, २०१७.

<u>**वाचा**</u> :-१) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.आस्थाप्र-२०१५/प्र.क्र.२७/आस्था-१, दिनांक १६/०३/२०१६.
२) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, समक्रमांक, दिनांक ०३/१०/२०१६ व दि.१६/०३/२०१७
३) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.आस्थाप्र-२०१६/प्र.क्र.३७५/आस्था-१, दिनांक २४/११/२०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक समक्रमांक दि.०२/१२/२०१६ व दि.१६/०२/२०१७
४) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/विसु-१, दि.१०/०२/२०१७
५) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.आस्थाप्र-२०१७/प्र.क्र.१९७/आस्था-१, दिनांक ०९/०६/२०१७.
६) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/आपुक, दि.०३/१०/२०१७

शासन निर्णय :

या विभागाच्या (खुद्द) मंत्रालयीन आस्थापनेकरीता १४६ पदे मंजूर असून त्यापैकी सोबतच्या विवरणपत्रात दर्शविलेली एकूण २७ पदे दिनांक ३०/०९/२०१७ पर्यंत चालू ठेवण्यास संदर्भ क्र.२ येथील दि.१६/०३/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली आहे. तद्नंतर प्रशासकिय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार ८०% पदे म्हणजेच ११६ पदे कायम करण्यास उपरोक्त संदर्भ क्र.३ नुसार मान्यता देण्यात आली आहे.

२. तद्नंतर या विभागातून विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग हा नवीन विभाग निर्माण करण्यात आला. सदर विभागास संदर्भ क्र.५ येथील शासन निर्णयान्वये या विभागातील एकूण१४६ पदांमधील २९ पदे हस्तांतरीत करण्यात आली. त्यामुळे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (खुद्द) मंत्रालयीन आस्थापनेकरीता एकूण ११७ पदे मंजूर असून त्यातील ६ अस्थाई पदे या विभागांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या राष्ट्रीय एकात्मता, विश्वबंधुत्व व विचार संवर्धन समितीच्या कामकाजासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत. सदर अस्थाई पदांना मुदतवाढ देण्याबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील. आता उर्वरित१११ पैकी २४ अस्थायी पदांना शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/ प्र.क्र.८/ १६/ आपुक, दि.०३/१०/२०१७ मधील अटींच्या अधीन दि.३१/१२/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

३. यासंदर्भात होणारा खर्च "मागणी क्रमांक एन-२, २२५१-सेक्रेटरीएट, सामाजिक सेवा-०९०-सेक्रेटरीएट (०१)(०१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (२२५१ ०११ ३) (०१) वेतन, योजनेतर" या लेखाशिर्षाखाली खर्ची घालण्यात येऊन त्या खाली सन २०१७-१८ या वर्षाकरीता मंजूर करण्यात येणाऱ्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

४. हे आदेश शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आपुक, दि.०३/१०/२०१७ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१७१०२४११४७५२८८२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

Dnyandev Laxman Sul

Digitally signed by Dnyandev Laxman Sul
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a19e16d10b98348341561863c7561e9fc35bb428cdc3ea443c0263495f76285a, serialNumber=0a540933faf44a550ca357b423fa83e6fdce81a4746d167dae68daa29726d41d, cn=Dnyandev Laxman Sul
Date: 2017.10.24 11:38:36 +05'30'

(ज्ञा.ल.सुळ)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), मुंबई.
२. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
४. वित्त विभाग (का.व्यय-१४), मंत्रालय, मुंबई.
५. अवर सचिव (का.रोखशाखा/अर्थसंकल्प), सा.न्या. व वि.स. विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६. निवडनस्ती (आस्था-१)

विवरणपत्र

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

शासन निर्णय : आस्थाप्र-२०१५/प्र.क्र.२७/आस्था-१

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : २४ ऑक्टोबर, २०१७.

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी (रुपये)	पदांची संख्या	
			कायम	हंगामी
	गट-अ			
१	सचिव	६७०००-७९०००(H.A.G.)	१	--
२	उप सचिव (भाप्रसे)	--	--	--
	किंवा सह सचिव/	३७४००-६७०००(ग्रेड पे-८७००)	--	--
	उप सचिव	१५६००-३९१००(ग्रेड पे-७६००)	१	२
३	अवर सचिव	१५६००-३९१००(ग्रेड पे-६६००)	२	३
४	सहायक संचालक	९३००-३४८००(ग्रेड पे-५४००)	१	--
		एकूण गट-अ पदे	**५**	**५**
	गट-ब			
१	कक्ष अधिकारी	९३००-३४८००(ग्रेड पे-४४००)	१२	१
२	वरिष्ठ स्वीय सहायक/	१५६००-३९१००(ग्रेड पे-६६००)	२	--
	निवडश्रेणी लघुलेखक	९३००-३४८००(ग्रेड पे-४६००)		
३	उच्चश्रेणी लघुलेखक	९३००-३४८००(ग्रेड पे-४४००)	३	१
४	सहायक कक्ष अधिकरी	९३००-३४८००(ग्रेड पे-४३००)	२८	१
५	निम्नश्रेणी लघुलेखक (मराठी)	९३००-३४८००(ग्रेड पे-४३००)	३	--
६	निम्नश्रेणी लघुलेखक (इंग्रजी)	९३००-३४८००(ग्रेड पे-४३००)	--	१
		एकूण गट-ब पदे	**४८**	**४**
	गट-क			
१	लघुटंकलेखक	५२००-२०२००(ग्रेड पे-२४००)	--	१
२	लिपिक-टंकलेखक	५२००-२०२००(ग्रेड पे-१९००)	२४	९
३	वाहन-चालक	५२००-२०२००(ग्रेड पे-१९००)	१	--
		एकूण गट-क पदे	**२५**	**१०**
	गट-ड			
१	हवालदार	४४००-७४४०(ग्रेड पे-१६००)	--	१
२	नाईक	४४००-७४४०(ग्रेड पे-१६००)	१	१
३	रोनिओ शिपाई	४४००-७४४०(ग्रेड पे-१६००)	--	१
४	झेरॉक्स मशीन चालक	४४००-७४४०(ग्रेड पे-१६००)	--	१
५	शिपाई	४४००-७४४०(ग्रेड पे-१३००)	८	१
		एकूण गट-ड पदे	**९**	**५**
		एकूण	**८७**	**२४**